**ग्रंथालय चळवळ बळकट करण्यासाठी एकत्रित काम करूया- श्री. गावडे**

ता. 09 ऑगस्ट 2019
18 श्रावण 1941

कृष्णदास शामा गोवा राज्य केंद्रीय वाचनालयाने पाटो येथील संस्कृती भवनातील विविद्योदेशी सभागृहात ग्रंथपाल दिवस साजरा करण्यासाठी गोवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान परिषद-2019 चे आयोजन केले होते.

कला व संस्कृतीमंत्री श्री. गोविंद गावडे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर कला व संस्कृती खात्याचे सचिव श्री. सी आर गर्ग, कला व संस्कृती खात्याचे संचालक श्री. गुरूदास पिळर्णकर, केंद्रिया वाचनालयाचे क्युरेटर डॉ. कार्लोस फर्नांडिस आणि वरिष्ठ ग्रंथपाल श्रीमती समीक्षा कोलमुले यावेळी उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना श्री. गावडे यांनी ग्रंथपाल आणि वाचनालय अॅटेंडंटना समर्पितवृत्तीने कार्य करण्याचा सल्ला दिला. आपल्या कार्यामुळे कदाचित एखाद्या व्यक्तीचे जीवन समृध्द होईल आणि बहुतेक वेळा तुम्हाला त्याची जाणीव नसते असे ते म्हणाले. ग्रंथपाल एखाद्या व्यक्तीसाठी ज्ञानाचे द्वार खुले करतो आणि योग्य दिशा निवडण्यासाठी त्याला किंवा तिला मार्गदर्शन करतो. निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठीही ते महत्वाची भुमिका बजावितात. पुस्तक हा आपल्या जीवनाचा मित्र आहे आणि त्यामुळे लोकांमध्ये वाचनाची सवय बिबविण्यासाठी आपण समर्पित होऊया आणि ग्रंथालय चळवळ बळकट करूया असे श्री गावडे म्हणाले.

सुरवातीस औपचारिक समई प्रज्वलनाने कार्यक्रमास सुरवात झाली. तद्नंतर मंत्र्यांनी वाचनालयाच्या वार्षिक अहवाल 2018-19, रूझवण तियात्र, गोवन ऑब्जरवराच्या पाखळ्यो, कुरपणे लेख, यादींतले गोंय, आणि डॉ. कार्लोस फ नांडिस यांचे गोवा-एलआयएस 2019 आणि श्री. मिलींद म्हामल यांचे कोकणी मराठीतील गोवा पब्लीक लायब्ररी अॅक्ट (गोवा सार्वजनिक वाचनालय कायदा) या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मंत्र्यांहस्ते वाचनालयाचे सुरक्षा रक्षक श्री. नामदेव गोकर्णेकर, श्री. देवदत्त काणकोणकर, श्री. दशरथ सावर्डेकर आणि श्री. दिपक गावस यांनी केलेल्या सेवेबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रंथपालांनी निबंध सादर केले.

डॉ. कार्लोस फर्नांडिस यांनी स्वागतपर भाषण केले तर श्री. पिळर्णकर यांनी एलआयएस-गोवा 2019 ची माहिती दिली. श्री. गर्ग यांचेही यावेळी भाषण झाले. श्री. प्रदिप नाईक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर श्रीमती कोलमुले यांनी आभार मानले.

महाविद्यालय, तालुका, जिल्हा आणि एनजीओचे ग्रंथपाल कार्यक्रमास उपस्थित होते.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/453

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA
PHONE-0832-2422675